माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## व्दितीय अपील क्रमांक २०४०/२०२२

राजेश लक्ष्मणराव रावळे,
रा. शिरजगांव बंड, ता. चांदुर बाजार,
जि. अमरावती

**अर्जदार**

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
तलाठी ब्राम्हणवाडा थडी,
ता. चांदुर बाजार, जि. अमरावती

**उत्तरवादी**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मंडळ अधिकारी, ता. चांदुर बाजार,
जि. अमरावती

| | |
|---|---|
| माहितीचा अर्ज /दाखल दिनांकः | ११.०२.२०२२ |
| ज.मा.अ. यांचे उत्तराचा दिनांकः | ३१.०३.२०२२ |
| प्रथम अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | ११.०३.२०२२ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दिनांकः | २५.०४.२०२२ |
| द्वितीय अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | ०४.०५.२०२२ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशापासून दिवसः | ०६ ; द्वितीय अपिल विहित वेळेत सादर केले |
| सुनावणी सूचना (नोटिस) दिनांकः | १३.०७.२०२२ |

अर्जदार यांनी मागितलेली माहितीचे वर्णन (जोडपत्र अ):

दि.२९.०७.२०२१ रोजी अर्जदार मैनाबाई गंगारामजी धर्वे/उमेश मारोतीराव धुर्वे रा.ब्राम्हणवाडी ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांची मौजा ब्रा.वाडी गट क्र.५७८ क्षेत्र ०८६ गट नं.४८४ क्षेत्र २.३३ मौजा ब्रा.वाडी गैर शेतकरी यांच्या बाबत तक्रार दाखल केली होती. मा.जिल्हा अधिकारी व उपविभागीय अधिकारी अचलपूर यांच्या कार्यालयाचे आपल्या कार्यालयात पत्र प्राप्त प्रकरण निकाली काढण्यात यावे. आजपर्यंत आपल्या कार्यालय मार्फत केलेली कार्यवाही संबंधीत माहिती तसेच वरिष्ठ कार्यालयाचे पत्राचे साक्षांकीत प्रत द्यावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

माहितीचा अधिकार



| उपस्थिती: सुनावणी दिनांक ०२.०८.२०२२ | व्यक्तीशः/ प्रतिनिधी | नांव |
|---|---|---|
| अर्जदार | व्यक्तीशः | राजेश लक्ष्मणराव रावळे |
| ज.मा.अ. | व्यक्तीशः | रविंद्र रामकृष्णा खानंदे, तलाठी |
| प्र.अ.अ. | व्यक्तीशः | संतकुमार यशवंत चव्हाण, मंडळ अधिकारी |

लघुरुपे: जन माहिती अधिकारी करिता ज.मा.अ. तथा प्रथम अपिलीय अधिकारी करिता प्र.अ.अ.

राज्य माहिती आयुक्त: डॉ. विनय कुमार सिन्हा

दिनांक: ०२ ऑगष्ट, २०२२

## आदेश

१. अर्जदार यांनी माहितीकरिता त्याचे अर्जावर जन माहिती अधिका-याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे कळवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) खाली दाखल केले द्वितीय अपिलावर आयोगानी चौकशी व सुनावणी करण्याचे ठरविले. सर्व संबंधितांना व्दितीय अपिल अर्जाबाबत त्यांचे म्हणणे लेखी सादर करण्यास संधी देवून सुनावणीचा दिवस कळविण्यात आला.

२. ज.मा.अ. यांनी दि.३१.०३.२०२२ चे पत्रान्वये उत्तर दिले:

" मैनाबाई गंगारामजी धुर्वे, २. उमेश मारोतीराव धुर्वे रा.ब्राम्हणवाडी येथे गट नं.५७८ व ४८४ क्षेत्र अनुक्रमे ०.४३ हे .आर, २.३३ हे.आर शेत जमिन आहे. आज ७/१२ मध्ये त्यांचे नाव मालकी हक्कामध्ये आहे. अर्जदाराला चौकशी केली असता अर्जदाराचे म्हणणे आहे की, तहसिल कार्यालय चांदुरबाजार येथील कोर्टात स्वतः प्रकरण दाखल केले आहे. सदर प्रकरण कोर्टात सुरु असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे."

३. प्र.अ.अ. यांनी प्रथम अपिलावर आदेश पारीत केले:

"जन माहिती अधिकारी तथा तलाठी ब्राम्हणवाडी थडी यांनी माहिती अधिकार २००५ अन्वये अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य १५ दिवसाच्या आत पुरविण्यात यावी व तसा अहवाल सादर करावा."

४. ज.मा.अ. यांनी सांगितले की, मैनाबाई गंगारामजी धुर्वे व उमेश मारोतीराव धुर्वे यांचे जागेवर गैर शेतकरी अतिक्रमण करुन शेती करत असल्याबाबतचे प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याने अर्जदार यांना दि.३१.०३.२०२२ चे पत्रान्वये तसे लेखी कळविण्यात आले.

५. अर्जदार यांचे म्हणणे आहे की, मैनाबाई गंगारामजी धुर्वे व उमेश मारोतीराव धुर्वे यांचे जागेवर गैर शेतकरी अतिक्रमण करुन शेती करत असल्याबाबत तक्रारी केल्या होत्या. सदर तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. परंतु ज.मा.अ. यांनी सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे कळविले.

६. तलाठी व मंडळ अधिकारी यांनी मैनाबाई गंगारामजी धुर्वे व उमेश मारोतीराव धुर्वे यांचे जागेवर इतरांचे अतिक्रमण बाबत (असल्यास तर) अर्ज प्राप्त झाले असेल तर त्याबाबत धुर्वे यांना दिलेले पत्राची प्रत किंवा अर्जावर वस्तुस्थिती अर्जदारास दि.३१.०३.२०२२ चे पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारची कार्यवाही पुर्ण झाली, असे समजण्यात येत आहे. दि.३१.०३.२०२२ चे पत्रातील तपशीलाची खात्री करुन वस्तुस्थिती पत्राद्वारे मैनाबाई गंगारामजी धुर्वे व उमेश मारोतीराव धुर्वे यांना कळविण्यात यावे, अशी अर्जदार यांची अपेक्षा आहे.

निर्णय

७. प्रस्तुत अपील निकाली काढण्यात येत आहे.

डॉ. विनय कुमार सिन्हा
राज्य माहिती आयुक्त